जिल्हा परिषद,पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या निवडणुकांची व्यवस्था

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१०/प्र.क्र.११७/पंरा-२
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: २० ऑगस्ट, २०१०

परिपत्रक

जिल्हा परिषदा,पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या निवडणुकांची सर्वस्वी जबाबदारी सध्या पुर्णपणे जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आल्यामुळे या निवडणूका पार पाडण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांचेकडील यंत्रणेला अतिरिक्त भार सहन करावा लागतो असे निदर्शनास आले आहे. वास्तव जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये निवडणुकीबाबतची काही जबाबदारी जिल्हा परिषद यांनी उचलावी असा निर्णय मा. प्रधान सचिव, राज्य निवडणूक आयोग यांच्या दालनात दि. २८/५/२०१० रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला. तसेच या निवडणूकांची मागील प्रलंबित देयके व सर्व खर्चाचे हिशोब याचा पाठपुरावा करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त कार्यालयातील आस्थापना विभागाशी संबंधित उपायुक्त यांच्यावर ठेवण्यात यावी, असाही निर्णय बैठकीत झाला .

वरील निर्णयानुसार यापुढे जिल्हा परिषदा,पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) जिल्हा परिषदा,पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये मतदान केंद्रांच्या व्यवस्थेबाबतची जबाबदारी जिल्हा परिषदांनी हाताळावी. सदरची मतदान केंद्रे प्रामुख्याने शाळांच्या इमारतीत असल्याने ती सुस्थितीत असतील व वापरण्यायोग्य राहतील याची खबरदारी जिल्हा परिषदांनी घ्यावी. यासाठी जिल्हा परिषदांतर्गत शाळांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी उपलब्ध निधीचा आवश्यकतेनुसार वापर करण्यात यावा.

२) जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांसाठी शासनाद्वारे उपलब्ध केलेल्या अनुदानाचे सनियंत्रण करण्यासाठी विभागीय आयुक्तालयातील उपायुक्त (आस्थापना) यांचेवर जबाबदारी सोपविण्यात येत आहे. त्यांनी याबाबत जिल्हाधिकारी यांचेशी समन्वय साधून निवडणूक खर्चाबाबत सनियंत्रण करुन यापुढे विभागांतर्गत निवडणूकीशी संबंधीत अनुदानाचे लेखे अद्ययावत ठेवले जातील याबर नियंत्रण ठेवावे. तसेच याबाबतची आवश्यक ती सर्व विभागवार एकत्रीत माहिती शासनास विहीत मुदतीत प्राप्त होईल याबाबत दक्षता घ्यावी.

३) मा. महालेखापाल यांनी शासनाच्या वारंवार निदर्शनास आणले आहे की, सन १९९३ ते २०१० अखेर जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुकांसाठी संक्षीप्त देयकावर मुख्य लेखाशिर्ष २०५३ मागणी क्र.०९ अंतर्गत काढलेल्या रक्कमांची प्रलंबित तपशीलवार देयके जिल्हाधिका-यांकडे वारंवार पाठपुरावा करुन देखील अद्यापपर्यंत सादर करण्यात आलेली नाहीत. यासंदर्भात शासनस्तरावरुनही संबंधितांना सातत्याने आवश्यक कार्यवाहीबाबत कळविण्यात आले आहे. तरीदेखील ही देयके प्रलंबित असल्याचे दिसते. ही तपशीलवार प्रलंबित देयके व यापुढील संक्षीप्त देयकावर काढलेल्या रक्कमांची तपशीलवार देयके एक महिन्याच्या आत महालेखापाल कार्यालयास सादर केली जातील याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. महालेखापाल (ले.व अ.), १/२, मुंबई/नागपूर
प्रधान सचिव, राज्य निवडणूक आयोग,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व उपायुक्त (आस्थापना)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.(सर्व)
उपसचिव (वित्त), ग्रामविकास व जलसंधारण विभाग
निवड नस्ती